**प्रेस नोट दिनांक १७/०४/२०१९**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**
**सात वर्षाचे मुलास वडीलांचे ताब्यात दिले बाबत.**

दि. ११/०४/२०१९ रोजी पोलीस उप-निरीक्षक,दर्शन शिंदे हे पोलीस ठाणे येथे ठाणे अमंलदार म्हणुन डयुटीस असताना,इसम नितीन नारायण घाग,वय-३६ वर्षे,रा.गजानन हौसींग सोसायटी मॉडले कॅालनी,शिवाजीनगर,पुणे यांनी त्यांची मुलगी ऋतवी नितीन घाग, वय-०७ वर्षे रा.सदर ही राहते घरा समोर दुपारी १२.०० वा.चे सुमारास खेळत असताना ती कोठेतरी हरवली आहे म्हणुन तक्रार देण्यासाठी पोलीस ठाणे येथे आले. त्यावेळी मा.बाळासाहेब कोपनर,वपोनि.शिवाजीनगर,पुणे यांनी पोउनिरी.दर्शन शिंदे, पो.ना.१६७० सांवत, पो.ना.रेंगडे, पो.ना.इनामदार, पो.शि.शिरकांडे यांना तात्काळ मुलीचा शोध घेणेबाबत सुचना देवुन रवाना केले.

वरील नमुद अधिकारी व कर्मचारी यांना सुचना देवुन रवाना केल्यानंतर सदर मुलीचा मॉडेल कॉलनी परिसरामध्ये शोध घेत असताना,सदरची मुलगी ही ती राहत असलेल्या बाजुच्या सोसायटी मध्ये लहान मुलांसोबत खेळत असताना मिळुन आल्याने,सदर मुलीस ताब्यात घेवुन तीचे वडिल नितीन नारायण घाग यांचे ताब्यात सुखरुप देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो स्टे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी.दर्शन शिंदे, पो.ना.श्रीकांत सांवत, पो.ना.योगेश रेंगडे, पो.ना.अशोक इनामदार, पो.शि.अशोक शिरकांडे यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**